।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

## SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR

Phone : (02462) 229294
Fax : (02462) 229572

Director-Board of Examinations & Evaluation

website: srtmun.ac.in
e-mail : directorboee@srtmun.ac.in


जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०१८–१९/2782 दिनांक : ०९/०३/२०१९

**परीक्षा प्राधान्य/तातडीचे**

प्रति,
**प्राचार्य/केंद्र प्रमुख**
उन्हाळी–२०१९ परीक्षा केंद्र/संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : उन्हाळी २०१९ परीक्षेसाठी उत्तरपुस्तीकेच्या मुल्यांकन कार्यपध्दतीमध्ये बदलाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व परीक्षांचे मुल्यांकन व नियमन कार्यात पारदर्शकता व गतीमानता येणेसाठी व पर्यायाने निकाल लावकर जाहिर करणेसाठी पदवी (बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) प्रथम व द्वितीय वर्षातील उत्तरपुस्तीकांचे मुल्यांकन हे महाविद्यालय स्तरावर करण्यात येत होते **यात बदल करण्यात आलेला असुन उन्हाळी–२०१९ परीक्षेपासून एकुण १३ जिल्हा/तालुका निहाय मुल्यांकन केंद्र तयार करण्यात आलेले असुन सदर केंद्रावर जिल्हा/तालुका निहाय महाविद्यालय व अभ्यासक्रमनिहाय उत्तरपुस्तीकेचे एकत्रित संकलन करून मुल्यांकन पूर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्रनिहाय यादी खालील प्रमाणे आहे.**

| जिल्हा | जिल्हा मुल्यांकन केंद्र | अंतर्गत तालुक्यातील महाविद्यालये | विद्याशाखा निहाय उत्तरपुस्तीकेचे मुल्यांकन व नियमनाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| **नांदेड** | यशवंत महाविद्यालय नांदेड | नांदेड,कंधार,लोहा, उमरी,अर्धापुर,मुदखेड | मानव्य विज्ञान विद्याशाखा |
| | सायन्स महाविद्यालय नांदेड | नांदेड,कंधार,लोहा, उमरी,अर्धापुर,मुदखेड | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| | पिपल्स महाविद्यालय नांदेड | नांदेड,कंधार,लोहा, उमरी,अर्धापुर,मुदखेड | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| | दिगंबरराव बिंदु महाविद्यालय भोकर | हिमायतनगर,माहुर,किनवट हदगाव, भोकर | सर्व विद्याशाखा |
| | देगलुर महाविद्यालय देगलुर | देगलुर,बिलोली,नायगाव, मुखेड व धर्माबाद | सर्व विद्याशाखा |

| | | | |
|---|---|---|---|
| **परभणी** | श्री.शिवाजी महाविद्यालय परभणी | परभणी जिल्हा | मानव्य विज्ञान विद्याशाखा |
| | ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी | परभणी जिल्हा | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| | कै.कमलाताई जामकर महिला महाविद्यालय परभणी | परभणी जिल्हा | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| **हिंगोली** | आदर्श महाविद्यालय, हिंगोली | संपुर्ण हिंगोली जिल्हयातील महाविद्यालय | सर्व विद्याशाखा |
| **लातूर** | दयानंद कला महाविद्यालय लातूर | लातूर, औसा, निलंगा, रेणापुर, चाकुर व शिरुर अनंतपाळ | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा |
| | दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर | लातूर, औसा, निलंगा, रेणापुर, चाकुर व शिरुर अनंतपाळ | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा |
| | महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूर | लातूर, औसा, निलंगा, रेणापुर, चाकुर व शिरुर अनंतपाळ | मानव्य विज्ञान विद्याशाखा |
| | शिवाजी महाविद्यालय उदगीर | उदगीर,देवणी,जळकोट व अहमदपुर | सर्व विद्याशाखा |

सर्व परीक्षा केंद्र प्रमुखांना कळविण्यात येते की, दररोज परीक्षा झाल्यानंतर सर्व उत्तर पुस्तिकांचे कोडनिहाय बंडल सिल करण्यापूर्वी त्या बंडलमध्ये उपस्थिती अहवालाची दोन प्रत व प्रश्न पत्रिकेची दोन प्रती टाकून सिलबंद करून वरील जिल्हा मुल्यांकन केंद्राकडे पाठविण्यासाठी तयार ठेवावेत व उपरोक्त प्रमाणे विद्याशाखा निहाय परीक्षा केंद्रावरील सर्व अभ्यासक्रमाच्या उत्तरपुस्तीका जिल्हा मुल्यांकन केंद्रावर संकलीत केल्या जातील व सर्व उत्तरपुस्तीकेचे जिल्हा मुल्यांकन केंद्रावर एकत्रीकरण, मास्कींग व कोडींग केले जाईल व या उत्तरपुस्तीका परत संबंधीत महाविद्यालयात मुल्यांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. यासाठी महाविद्यालय स्तरावर कॉलेज कॅप ऑफिसर, सहाय्यक व सेवक या पूर्वी प्रमाणे नेमण्यात यावेत. या उत्तर पुस्तिकांचे मुल्यांकन तीन दिवसात पूर्ण होईल या बाबत प्राचार्य, कॅप ऑफीसर व संबंधित प्राध्यापक या सर्वांनी कार्य करावे. सर्व उत्तरपुस्तीकांचे १०० टक्के नियमन जिल्हा मुल्यांकन केंद्रावर करण्यात येणार आहे. सदर कार्यपध्दती उन्हाळी–२०१९ च्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता असेल.

सबब, वरील प्रमाणे कार्यपध्दतीची नोंद घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करून सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :

१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र.अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
५. समन्वयक–केंद्रीय मुल्यांकन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ
६. समन्वयक, सर्व जिल्हा/तालुका मुल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ.
७. सर्व अधिक्षक, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.